संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठ परीक्षा उन्हाळी २०२० रोखलेल्या निकालांबाबत सूचना

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षांचे निकाल जाहीर झाले असून बऱ्याच विद्यार्थ्यांचे निकाल विविध कारणांस्तव रोखलेले आहेत. त्याकरीता विद्यार्थी मोठ्या प्रमाणात विद्यापीठामध्ये येत आहेत.

कोव्हीड १९ च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे कोव्हीड १९ च्या प्रादुर्भावाने प्रभावित होण्याचे वाढते प्रमाण विचारात घेता सर्व संलग्नित महाविद्यालयांना सूचित करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांचे निकाल रोखण्यात आले आहेत, अशा विद्यार्थ्यांचे त्रुटींचे स्वरुप विचारात घेवून रोखलेल्या निकालांची पूर्तता करण्याकरीता आवश्यक दस्तऐवज महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर विद्यार्थ्यांकडून जमा करुन ते विद्यापीठामध्ये एकत्रितरित्या सादर करावेत. दस्तऐवज विद्यापीठात जमा केल्यापासून तीन दिवसात त्रुटींची पूर्तता करुन गुणपत्रिका महाविद्यालयांना हस्तांतरीत करण्यात येईल.

तरी प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात, तसेच महाविद्यालयाच्या मुख्य सूचना फलकावर विद्यार्थ्यांकरीता उपरोक्त प्रमाणे सूचना प्रसिद्ध करावी, असे आवाहन विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी पत्र पाठवून केले आहे. तरी सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १५/१२/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी